पुणे येथील मे. के. एस. नावंदर सो. दिवाणी न्यायाधीश सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात
जाहीर नोटीस

रे. दिवाणी दावा क्रमांक १५४१/२०१८
निशाणी क्रमांक : २२

श्री. चंद्रकांत पमन गुंजाळ व इतर ३
रा. मु.पो. सोरतापवाडी,
ता. हवेली, जि. पुणे. ...वादी

विरूद्ध

गाव कामगार तलाठी
सोरतापवाडी व इतर १ ...प्रतिवादी

नोटीस देण्यात येते की, उपरोक्त वादी यांनी भारतीय पुरावा कायदा कलम अन्वये या कोर्टाकडे ठकुबाई देवराम गुंजाळ ह्या दिनांक २३/०१/०७ पासून परागंदा असलेने यांचा दिवाणी मृत्यू घोषित करून मिळण्यासंबंधीचा दावा दाखल केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी **नेमलेली तारीख १३/१०/२०२१ रोजी** ठीक सकाळी ११.०० वाजता स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक २१/९/२०२१ रोजी माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

हुकूमावरून,
सही/-
अधीक्षक,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, पुणे
शिक्का

जाहीर नोटीस

तमाम लोकांस, विशेषतः गाव मौजे मुंढावरे येथिल व पंचक्रोशीतील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, गाव मौजे मुंढावरे ता. मावळ, जि. पुणे येथील खालील परिशिष्टात सविस्तर वर्णन केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालक **१) श्री. उत्तम किसन पाटील, २)श्री. सागर दिलिप टिंगरे, ३) श्री. ज्ञानेश्वर दिलिप टिंगरे** यांची खरेदी ताबे मालकी व वहीवाटीची असुन सदर मिळकत त्यांचे प्रत्यक्ष ताबे वहिवाटीत असल्याचा व सदर मिळकतीची विक्री करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला असुन सदर संपुर्ण मिळकत विद्यमान मालकांनी आमचे अशिल श्री. योगेश नारायण पठारे व सौ. राधा संदिप सपाट यांस कायम खुष खरेदी देण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतींमध्ये अन्य कोणाचे तोंडी अथवा लेखी करारमदार, गहाण, दान, भाडेपट्टा, कुळ, पोटगी, अन्य वहिवाट अथवा अन्य हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध होताच वीस दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमच्याकडे लेखी कळवून खात्री करून द्यावी. अन्यथा त्यांनी त्याचे तथाकथित हक्क हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पुर्ण करतील व तथाकथित हक्क हितसंबंध आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : तुकडी पुणे, पोट तुकडी मावळ, पंचायत समीती मावळ,गाव मौजे मुंढावरे तालुका मावळ, जिल्हा पुणे येथिल जमिन मिळकत सर्व्हे नंबर २५ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ५२ आर अधिक पोटखराबा ०० हेक्टर ०२ आर असे एकुण क्षेत्र ०० हेक्टर ५४ आर आकार ०० रुपये ६२ पैसे अशी संपुर्ण मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेस- सर्व्हे नंबर २३ व २४, दक्षिणेस- रोड व सर्व्हे नंबर २४, पश्चिमेस- सर्व्हे नंबर २६, उत्तरेस- सर्व्हे नंबर २०.

२१/०९/२०२१. चाकण, पुणे.

सही/-
ॲड. सोमनाथ मकरध्वज दौंडकर
ऑफीस : शॉप नं. ५, विशाल मार्केट, चाकण-शिक्रापूर रोड, चाकण, ता. खेड, जि. पुणे. मो. ९६८९५३५३५३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस व जाहीर जाणीवीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या **१. रूपाली सिताराम खेडेकर २. दिपाली रविंद्र बोरकर ३. वृषाली बजरंग खेडेकर,** सर्व रा. झेंडेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे, यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीची व अविभक्त हिश्याची आहे. सदर विद्यमान मालकांनी सदर मिळकती आमचे अशिलांना नोंदणीकृत दस्ताद्वारे खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. त्याबाबत दैनिक पुण्यनगरी या वृत्तपत्रात **दिनांक १८/०९/२०२१ रोजी** ॲड. रविशंकर ठोंबरे यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली होती. परंतु सदरचा व्यवहार हा काही तांत्रिक कारणास्तव रद्द झाल्यामुळे दिनांक १८/०९/२०२१ रोजी प्रसिद्ध केलेली जाहीर नोटीस ही प्रस्तुत जाहीर जाणीवेने रद्दबातल करीत आहे. सबब ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे.

परिशिष्ट : तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका पुरंदर, जि. पुणे मे. दुय्यम निबंधक साहेब, पुरंदर, पुणे, यांचे कार्यक्षेत्रातील तसेच जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती पुरंदर पैकी ग्रामपंचायत झेंडेवाडी यांचे हद्दीतील गाव मौजे झेंडेवाडी येथील **गट नं. ५, ६, ३१, ३२, ५३, १०२, १२८, १३२, ४३४** ही मिळकत व त्यावर आर.सी.सी.मध्ये बांधण्यात आलेली घर मिळकत.

सही/-
स्थळ : पुणे
तारीख : २१/०९/२०२१
ॲड. विशाल व्यंकटराव मनाले
पत्ता : ऑफीस नं. २०२, लॉ पॉईंट प्रॉपर्टी बिल्डींग, फॅमिली कोर्टाच्या मागे, शिवाजीनगर, पुणे ४११००५. **मोबाईल : ९४०४३४७७८५**

PUBLIC-NOTICE

Notice is hereby given to general public that Land bearing Plot No. 175 which is more particularly described in schedule hereunder written is owned by **Mr. Atul Nautiyal & Mrs. Neerja Nautiyal** Both R/ at 557, Great Elm Way Acton, MA01718 USA. The said owners have assured to my client that they are the absolute owners of the said plot/land & thus have further agreed to sell the said plot to my client. Any persons having or claiming any kind of right, title, claim, demand or estate interest in respect of the said plot/land or to any part thereof by way of sale, exchange, mortgage, let, lease, lien, charge, maintenance, gift, inheritance, share or encumbrance of whatsoever nature or otherwise are hereby requested to intimate to the undersigned in writing at the address mentioned below of any such claim accompanied with all necessary and supporting documents within 10 days from the date of publication hereof, failing which the negotiations & Sale shall be completed, without any reference to such claims and the claims if any, shall be deemed to have been given up or waived. **SCHEDULE :** All that piece and parcel of land bearing Plot No. 175 admeasuring area about 151.13 Sq.mtrs i.e. about 1627 Sq.ft out of the sanctioned layout of vacant plot of land admeasuring area about 140866.42 sq.mtrs i.e. 14 hectors 08.6642 Ares being Tukada / Plot No. A,B,& C, part of Gat No. 1420, admeasuring area about 31 Hectors 57 Ares situated Kamalbaug Sahakari Gruhrachana Sanstha Maryadit which is registered under Maharashtra Co-operatives Society Act having registration no. PNA/PNA (4) /HSG/(TO)/1177/2005-06 dated 05/01/2006 situated at Village Wagholi, which is within the registration District Pune, Sub - Registration District Haveli No. 7, Taluka Haveli, within the limits of Grampanchayat Wagholi, Taluka Panchayat Haveli, Zilla Parishad Pune and which plot is bounded as follows : On or towards East : By Plot No.180, On or towards South : By Plot No. 176, On or towards West : By Colony Road, On or towards North : By 174

Pune, Date: 21/09/2021

Sd/-
ADV. MONALI H. BHONSALE
office :- Survey no.47, Sankalp Society, Lane no. 1, Sunita Nagar, Wadgaon Sheri, Pune 411014. Mobile - +91-8446363926

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकती ह्या आमचे अशिल १) सौ. मनुबाई उर्फ ताराबाई नारायण आंग्रे (लग्नापुर्वीचे नाव मनुबाई भानु तापकीर) रा. भुगाव, ता. मुळशी, जिल्हा पुणे तसेच २) सौ. आशा प्रकाश चौधरी (लग्नापुर्वीचे नाव आशा भानु तापकीर), रा. नायगाव, ता. हवेली, जि. पुणे यांच्या वडिलोपार्जित मालकी वहिवाटीच्या मिळकती आहेत. सदरहू मिळकतीपैकी गट नं. २३/२ संदर्भात श्री. लालदास भानु तापकीर यांनी आमचे अशिलांकडून दिनांक ०२/०७/२०१६ रोजी विनामोबदला कुलमुखत्यारपत्र स्वतःचे नावे करून घेतलेले आहे. सदरहू कुलमुखत्यारपत्राचा दस्त मे. दुय्यम निबंधक हवेली नं. १७ यांचे कार्यालयात अनुक्रमांक ४२९२/२०१६ रोजी नोंदवून घेतला आहे.

सदरचे कुलमुखत्यारपत्र नं. ४२९२/२०१६ हे आमचे अशिलांनी श्री. लालदास भानु तापकीर यांचे नावे दिनांक २०/०९/२०२१ रोजी पाठविलेल्या नोटीसीने रद्द केलेले आहे. तरी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून कोणीही श्री. लालदास भानु तापकीर यांचेशी खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात व्यवहार करू नये. याउपरही जर कोणी सदर श्री. लालदास भानु तापकीर यांचेबरोबर खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीसंदर्भात कुठल्याही प्रकारचा व्यवहार केल्यास तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व होणाऱ्या नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. कळावे. सबब ही जाहीर नोटीस दिली असे.

परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी, तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधकसाहेब हवेली यांचे कार्यक्षेत्रातील व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे चोविसावाडी (कलम ए ते इ मधील) व मौजे वडमुखवाडी (कलम एफ ते जी मधील) येथील मिळकतीमधील हिस्सा :. ए) गट नं. २९, हिस्सा नं. १४ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ३६ आर बी) गट नं. २९, हिस्सा नं. १७ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ०३ आर, सी) गट नं. ३, हिस्सा नं. ५ यांसी क्षेत्र ०० हेक्टर १५ आर, डी) गट नं. २३, हिस्सा नं. २ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ६६ आर, इ) गट नं. ६, हिस्सा नं. १८ मधील असलेल्या हिश्याप्रमाणे, एफ) गट नं. ३१, हिस्सा नं. ८ यांसी क्षेत्र ०० हेक्टर १९ आर, जी) गट नं. ३२, हिस्सा नं. २ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ०७ आर.

पुणे, दिनांक : २२/९/२०२१ सही/-
ॲड. गणेश वामनराव पवार
ऑफिस नं. ५०१, वकीलनगर, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल जवळ, एरंडवणा, पुणे- ४११ ००४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली फ्लॅट मिळकत **१) श्री. सचिदानंद सुब्रा मनी, २) सौ. पद्मा मनी, दोघेही रा.** फ्लॅट नं. डी - १००१, विन्डसर रेसीडेन्सी, बाणेर रोड, बाणेर, पुणे - ४११ ०४५, यांची मालकीहक्काची व ताबेवहिवाटीची असल्याचा भरवसा दिला असून, सदरहू फ्लॅट मिळकत आमचे अशिलांस विकण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकतीचे टायटल तपासणीसाठी ही जाहीर नोटीस दिली आहे.

सबब सदर फ्लॅट मिळकतीची मालकी, इतर हक्क याबाबत कोणाचे काही हक्क, हितसंबंध, बोजे, करार. मदार, इसार, जप्ती, अदलाबदल, गहाण, दान, लिज, लिन, बक्षिस, पोटगी, वारसाहक्क, उलटखरेदीची बोली, जप्ती, दावा, तबदिली, वगैरे अगर अन्य स्वरुपाचे हक्क असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत कागदपत्रानिशी खालील पत्यावर लेखी हरकत देवून तशी लेखी पोहच घ्यावी. अन्यथा खाली परिशिष्टात नमूद केलेली मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहीत असून, सदर मिळकतीबाबत इतर कोणाचेही हक्क व हितसंबंध नाहीत व असल्यास ते हक्क त्यांनी जाणीवपुर्वक, समजून उमजून सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाची काही एक तक्रार चालणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली, जि. पुणे मे. दुय्यम निबंधक साहेब हवेली, तसेच पुणे महानगरपालिकच्या हद्दीतील गाव मौजे बाणेर सर्व्हे नं. १३५/१, १३५/२, १३५/३, १३५/४ पार्ट, या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **'विन्डसर रेसीडेन्सी अपार्टमेंट कंडोमिनियम'** मधील **विंग/बिल्डींग नं. डी** मधील दहाव्या मजल्यावरील **फ्लॅट नं. डी-१००१,** यांसी क्षेत्र ११६९ चौ. फुट म्हणजेच १०८.६० चौ. मी. कारपेट व लगतचे टेरेस क्षेत्र १६१ चौ. फुट म्हणजेच १४.९६ चौ. मी. व कव्हर्ड कार पार्किंग नं. सी-१७ व १.०२% अविभक्त हिश्यासह मिळकत.

पुणे,
दिनांक : २२/०९/२०२१ सही/-
ॲड. सतीश मा. पावणे
ऑफिस नं. २१३, दुसरा मजला, अमित कोर्ट, मंगला थिएटरच्या पाठीमागे, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ मो. नं. ८०८७३०४१३८

पुणे येथील मे. डोलारे कोर्ट प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी फौजदारी न्यायालय नं. ६ येथे
जाहीर नोटीस

एम. ए. नं. २२६२/२०२१
जन्म नोंद कलम : १३(३)

हनमंत कृष्णाजी गायकवाड
...अर्जदार

विरुद्ध

मा. निबंधक सो., जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे ...जाब देणार

याद्वारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंदणी कलम १९६९ कलम १३(३) प्रमाणे त्यांचे **इंदुबाई कृष्णाजी गायकवाड यांचा दिनांक १६/१/२००६ रोजी कोलवडी,** साष्टे, ता. हवेली, जि. पुणे या पत्त्यावर मृत्यु झाल्याची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी नेमलेली **तारीख २१/१०/२०२१ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता** स्वतः किंवा वकिलांमार्फत या न्यायालयात हजर रहावे.

आज दिनांक १८/९/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

हुकूमान्वये,
सही/-
सहायक अधीक्षक,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे
शिक्का

पुणे येथील मे. एम. अे. शेख प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी फौजदारी न्यायालय यांचे कोर्टात
जाहीर नोटीस

एम. ए. नं. ३०३९/२१
जन्म नोंद कलम : १३(३) नि : ८

श्री. संपत कुमार गुलाबचंद परमार
...अर्जदार

विरुद्ध

मा. मुख्य निबंधक
जन्म मृत्यु नोंदणी पुणे म.न.पा. ..जाब देणार

याद्वारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंदणी कलम १९६९ कलम १३(३) प्रमाणे त्यांचे **स्व. गुलाबचंद हिम्मतमल परमार यांचा दिनांक ९/१२/१९५९ रोजी** १६५३ शुक्रवार पेठ, पुणे पत्त्यावर मृत्यू झाल्याची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

ज्या कोणास सदरहू अर्जासंबंधी हरकत घ्यावयाची असेल त्यांनी नेमलेली **तारीख २१/१०/२०२१ रोजी ठीक सकाळी ११.०० वाजता** स्वतः किंवा वकिलांमार्फत या कोर्टात हजर रहावे.

आज दिनांक १७/०९/२०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

हुकूमावरून,
सही/-
सहा. अधीक्षक,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट क्र. ६, पुणे
शिक्का

जाहीर सूचना

महाराष्ट्र सरकार, पर्यावरण विभाग, खोली क्रं. २१७, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ यांनी त्यांच्या पत्र क्रं. SEIAA-EC-0000002001 दिनांक १४ सप्टेंबर २०१९, द्वारे मे. विवांता रिअल्टी, पुणे ह्यांच्या रहिवासी आणि व्यावसायिक प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक परवानगी दिली आहे.

सदर पर्यावरण विषयक परवानगीच्या प्रती आपल्या माहितीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे उपलब्ध असून महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाच्या पुढील संकेतस्थळावर पाहू शकता. https://www.ecmpcb.in/

मे. विवांता रिअल्टी
सं. न. १३३ (P), १३४ (P), १५८ (P), १५९ (P),
पी के इंटरनॅशनल स्कुल जवळ,
पिंपळे सौदागर, ता. हवेली, जि. पुणे.

कामगारांसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस/कामगारांना या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीपैकी परिशिष्टमध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत मे. स्वराज लॅन्डमार्कस एलएलपी, पत्ता २०१, बी ए गेटवे, सकाळनगर, गेट नं.१ जवळ, बाणेर रोड, औंध, पुणे ४११००७ यांनी नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केलेली आहे.

सदर परिशिष्टामध्ये नमूद केलेली जमीन मिळकत ही औद्योगिक विभागामध्ये आहे. सदर जमीन मिळकतीचे आम्हाला विकसन करावयाचे आहे. त्याकरिता मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संबंधित कामगारांचे कायदेशीर देय देणे प्रलंबित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहे. सदर मिळकतीवर आजतागायत कंपनी/कारखाना नव्हता व नाही तसेच कोणीही कामगार नव्हते व नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे कायम कामगार/कर्मचारी, तात्पुरते, कंत्राटी तसेच प्रशिक्षणार्थी कामगारांची वा त्यांच्या संघटनेची कामगारांच्या कायदेशीर देणी आमच्याकडे प्रलंबित नाहीत. तरीही सदर मिळकतीशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या कामगारांच्या कामगार संघटनेच्या कायदेशीर देय देणीबाबत काही हरकत/तक्रार/शिल्लक देणी असल्यास त्यांनी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत मा. कामगार उप-आयुक्त यांचे कार्यालय, बंगला क्र.५, मुंबई-पुणे रोड, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे ४११००५ अथवा आमचे खालील नमूद पत्त्यावरील कार्यालयात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

परिशिष्ट : तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका हवेली मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली, तसेच पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे हडपसर, ता.हवेली, जि.पुणे येथील सिटी स.नं.४५९२, हिस्सा नं.२ [जुना स.नं.११२, हिस्सा नं.१अ] यांसी एकूण क्षेत्र ०० हे. ६९.६६४६ आर यांसी प्लॉट नं.५५ यांसी क्षेत्र ६९६६.४६ चौ.मी. म्हणजेच ७४९८६.९७ चौ.फूट जमीन मिळकत यांसी **चतु:सीमा** येणेप्रमाणे : **पूर्वेस :** डी.पी. रोड, **दक्षिणेस :** प्लॉट नं.५३, **पश्चिमेस :** प्लॉट नं.५४ पैकी, **उत्तरेस :** प्लॉट नं.५५ आणि डी.पी. रोड. येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक जमीन तदंगभूत जल, तरू, काष्ठ, पाषाण, इत्यादीसहित इजमेंटचे रस्ता वापरण्याचे हक्कांसहित निधी निक्षेपासह.

दि.२१/०९/२०२१

मे. स्वराज लॅन्डमार्क एलएलपी,
२०१, बी ए गेटवे, सकाळनगर, गेट नं.१जवळ,
बाणेर रोड, औंध, पुणे ४११००७.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली फ्लॅट मिळकत ही **१) मयत उल्हास गोविंद फडके व २) श्री. प्रणव उल्हास फडके** रा. पुणे यांच्या मालकी हक्काची असुन ताबे वहिवाटीत आहे. मयत उल्हास गोविंद फडके यांचे दि. ०९/०२/२०२१ रोजी पुणे मुक्कामी निधन झाले असुन सदर फ्लॅट मिळकत ही १) मयत उल्हास गोविंद फडके यांचे कायदेशीर वारस श्री. प्रणव उल्हास फडके, (मुलगा) म्हणुन व स्वःता करिता व २) मयत उल्हास गोविंद फडके यांचे कायदेशीर वारस सौ. माधवी चिंतामणी मराठे, लग्नापुर्वीचे नाव माधवी उल्हास फडके (विवाहित मुलगी) यांनी आमच्या अशिलांना विकत देण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर फ्लॅट मिळकत निर्वेध निजोखमी, बोजारहीत, क्लिअर टायटल असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमच्या अशिलांना दिली आहे. तथापी सदर फ्लॅट मिळकतीवर त्याच्या शिवाय ईतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, मालकी हक्क, वारसा हक्क, हितसंबंध, ईजमेंट, वहिवाट, गहाण, बोजा, कर्ज, खरेदी, करारनामा, वाटणी, बक्षिस, पोटगी, गहाण, दान, चोळी बांगडी, विसारपावती, लिन, लिज इ. अधिकार असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१५ दिवसांच्या आत** आमच्या खालील पत्त्यावर येऊन आमची अस्सल कागदपत्रांनिशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदर फ्लॅट मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बोजारहित, क्लिअर टायटल असल्याचे समजून व अशा व्यक्तींनी त्याचे असलेले सर्व हक्क, हितसंबंध व अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून, आमचे अशिल पुढील सदर फ्लॅट मिळकत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार/ हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - तुकडी पुणे, पोट तुकडी ता. हवेली, जि. पुणे व मे. दुय्यम निबंधक हवेली पुणे यांच्या कक्षेतील व पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गांव मौजे-मुंजेरी - बिबवेवाडी येथील सं. नं. ६३४ हिस्सा नं. २ए, सिटी एस नं. ४७५ या मध्ये बांधलेल्या मधुसुदन पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १३ यांसी क्षेत्र ८६० चौ. फुट म्हणजेच क्षेत्र ७९.९२ चौ.मी. बिल्ट अप अशी फ्लॅट मिळकत, संपुर्ण ईमारतीची **चतु:सीमा पुढील प्रमाणे - पुर्वेस -** जमीन मिळकती मधील उर्वरीत पार्ट (भाग), **दक्षिणेस -** भारत ज्योती सोसायटी ची मिळकत, **पश्चिमेस -** श्री. ढेरे यांची मिळकत फ्लॅट नं. २, **उत्तरेस -** बिबवेवाडी गांवठाण रोड.

ता. २२/०९/२०२१ सही/-
आर. जे. डिसिल्वा ॲडव्होकेट द्वारा एच. आर. चौधरी (सिरवी) ॲडव्होकेट
कार्यालय : गोयल रेसिडेन्सी, ए - बिल्डींग, पहिला मजला, कासारवाडी, पुणे - ३४. **मो.: ९८५०८८७५५०**

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, **श्री. कशिशकुमार कस्तूरचंद जायसवाल,** राहणार- गुरुनानक वार्ड, गोंदिया ४४१६०१ हे विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना निरुपण केले असून खात्री आणि भरवसा दिला आहे की खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत (ज्यांसी या पुढे सोयीसाठी **'सदर मिळकत'** असे संबोधले आहे) ही त्यांची स्वकष्टार्जित मालकी आणि वहिवाटीची मिळकत आहे तसेच सदर मिळकतीमधील त्यांचे हक्क व अधिकार आजरोजी अबाधित असून संपूर्णपणे निर्वेध, निजोखमी, वादरहित, बोजारहित असून सदर मिळकत आजरोजी सदर विद्यमान मालक यांच्या प्रत्यक्ष ताबेवहीवाटीत आहे. सदर निरुपण आणि आश्वासनांवर पूर्णपणे विश्वास ठेऊन आमच्या अशिलांनी सदर विद्यमान मालक यांच्या सोबत बोलणी करून सदर मिळकतीचे खरेदीसाठीचे सर्व अटी व शर्ती कायम केल्या असून त्या अन्वये सदर मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर विद्यमान मालक यांचे सदर मिळकतीबाबतचे मालकी आणि ताबेवहिवाटीच्या हक्कांच्या पडताळणीच्या हेतुने आम्ही आमच्या अशिलांच्यावतीने आजरोजी प्रस्तुत जाहीर नोटीस प्रकाशित करत आहोत. सदर मिळकतीवर किंवा तिच्या कुठल्याही भागावर अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचे करार-मदार, साठेखत, गहाण, मुखत्यारपत्र, लीन, भाडेपट्टाकरार, दान, बक्षीस, खरेदी, विसारपावती, अदलाबदल, चोळी, बांगडी, बोजा, तारण, वारसहक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, न्यायालयीन दावा, नोटीस, इत्यादी वारसाहक्क, हिस्सा, हक्क, अधिकार अगर हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटिस प्रसिद्ध झालेपासून **१० (दहा) दिवसांच्या आत** संबंधित मूळ कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर आम्हास समक्ष भेटून आमची खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी, बोजारहीत असून त्यामध्ये सदर विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीचा हक्क अधिकार व हितसंबंध नाही असे समजण्यात येईल व यदाकदाचित असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही आणि आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीसाठीचा मोबदला अदा करून खरेदीखत लिहून आणि नोंदवून घेतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

परिशिष्ट

तुकडी पुणे पोट तुकडी तालुका मुळशी, व जिल्हा पुणे, यांचे कार्यक्षेत्रातील पुणे महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे बावधन खुर्द येथील सर्व्हे नं. ७+८ मधील प्लॉट क्रमांक ७अ यांसी एकूण क्षेत्र ३२४६.८० चौ. मीटर या मिळकतीवर बांधलेल्या शगुन निसर्ग प्रकल्पामधील ''ए'' विंगमधील स्टील्ट मजल्यावरील फ्लॅट नं. ४ यांसी क्षेत्र ७०.१० चौ. मी. बिल्टअप व लगतचे टेरेस यांसी क्षेत्र ६.१३ चौ. मी. ही मिळकत. सही/-

दिनांक : २२/०९/२०२१ लेक्स क्रेडन्स तर्फे ॲड. अमित वि. नलवडे
सुबोध हाईट्स, प्लॉट नं. ४१, सि.टी.एस. नं. १२४/२/बी१, शिवप्रसाद को-ऑप. सोसायटी, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे. ४११०३०. **मो. नं. ९६७३ ९९९ ३५१**

जाहीर नोटीस

आमचे अशिल क्र. १) नंदकिशोर विष्णुपंत जोशी, २) सौ. साधना नंदकिशोर जोशी व ३) डॉ. प्रतिक नंदकिशोर जोशी सर्व रा. बालाजी नगर, उमरगा, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद यांनी मला दिलेल्या माहितीवरुन व अधिकारावरुन शहर-पुणे येथील आणि त्या परिसरातील तमाम लोकांना या नोटीसने कळविण्यात येते की, आमचे अशिल क्र. १ व २ यांचा मुलगा व अशिल क्र. ३ यांचा लहान भाऊ नामे अक्षय नंदकिशोर जोशी रा. उमरगा, हा. मु. पुणे हा पुणे येथे राहत होता. तो दि. ०२/०८/२०२१ रोजी दुपारी कोणालाही न सांगता आमचे अशिलाची फोर्ड फिगो कंपनीची कार ज्याचा क्र. MH-25-R-3143 ही कार घेऊन घरातून पुणे येथे नौकरी करतो म्हणून निघून गेला आहे. जेंव्हा आमचे अशिलास हा सर्व प्रकार लक्षात आला तेंव्हा त्यांनी पुण्याला जाऊन त्याची चौकशी केली असता त्याला कुठलीही नोकरी नसून तो लोकांकडून विविध खोटी कारणे सांगून पैसे/कर्ज घेतले होते व घेतलेल्या कर्जाचे पैशातून तो ड्रग्ज, गांजा, दारु, सिगारेट अशी व्यसने करु लागला आहे हे आमचे अशिलास लक्षात आले. सध्या आमच्या अशिलाचा मुलगा अक्षय हा खुपच व्यसनाचे आहारी गेल्याने त्याची मानसिक स्थिती ठीक नसल्याने त्यास सोलापूर येथील डॉ. प्रसन्न खटावकर यांचे आधार हॉस्पीटल येथे व्यसनमुक्ती केंद्रात त्यास दिड-दोन महिना Admit करुन संपुर्ण उपचार केला व पुढील उपचार चालू ठेवला. काही काळ तो कुटूंबात राहून चांगले आचरण करुन व्यवस्थित राहत होता. परंतू गेल्या काही महिन्यापासून आमचे अशिलाचा मुलगा अक्षय जोशी हा परत ड्रग्जचा नशा करणे, दारु पिणे, भांडण-तंटा करणे, व्यसन करण्यासाठी वारंवार पैसे मागणे, लोकांकडून, मित्रांकडून, नातेवाईकांकडून उधार पैसे घेणे व परत न करणे व सतत व्यसन करणे ह्या गोष्टी तो करु लागला आहे. आमचे अशिलाचा मुलगा नामे अक्षय जोशी हा एक मनोरुग्ण असुन त्याचे डोक्यावर परिणाम झाला आहे. त्यास ड्रग्ज, गांजा अशा वाईट व्यसनाची सवय लागली आहे. आता तो एक मनोरुग्ण असून त्याला चांगले किंवा वाईट असे काही समजत नाही. तो कुणालाही शिव्या घालत फिरत आहे. परंतू लोकांकडून पैसे काढण्यासाठी त्यांना गोड-गोड बोलून, खोट्या-नाट्या सबबी सांगून तो अडचणीमध्ये असल्याचे भासवून लोकांना भेटून, फोन करुन लोकांकडून पैशाची मागणी करीत आहे. अशा परिस्थितीत आमचे अशिल क्र. १ व २ चा मुलगा व अशिल क्र. ३ चा भाऊ नामे अक्षय नंदकिशोर जोशी यांने कोणत्याही व्यक्तीसोबत कुठल्याही प्रकारचा पैशाचा व्यवहार केला, पैसे उधार घेतले किंवा अन्य कुठल्याही गोष्टीचा व्यवहार केला तर त्यास आपण व्यवहार करणार किंवा पैसे घेणार व देणार हे सर्वस्वी जबाबदार असाल. त्यांनी केलेल्या परस्पर व्यवहाराशी आमचे अशिल क्र. १ ते ३ यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही व त्यास आमचे अशिल क्र. १ ते ३ हे जबाबदार राहणार नाहीत. तसेच त्याचेकडून केलेले बेकायदेशीर कृत्यास आमचे अशिलांचे कांही एक संबंध नसणार नाही. त्यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्यास व फौजदारी गुन्ह्यास तोच सर्वस्वी जबाबदार असणार आहे. त्यामुळे पुणे शहरातील तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल क्र. १ व २ चा मुलगा अक्षय जोशी हा एक मनोरुग्ण असून त्याच्यासोबत कोणत्याही व्यक्तीने कुठलाही संबंध ठेवू नये व व्यवहार करु नये, जर तो केला तर तो बेकायदेशीर असून त्याची जबाबदारी व्यवहार करणारेवर राहील. समाजातील लोकांस, नातेवाईकास, मित्र परिवारास अक्षय जोशीपासून कुठल्याही प्रकारची आर्थिक किंवा अन्य कोणती हानी होऊ नये म्हणून हि जाहीर नोटीस दिली. सही/-

दिनांक : २१/०९/२०२१
ॲड. शशिकांत बी. राऊत
न्यू बिल्डिंग बार रूम, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ मो. ९१७५२९२८२९

मे. पी. ए. आपट